# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय

अवसरी खुर्द, ता.आंबेगाव, जि.पुणे - ४१२४०५.

दूरध्वनी क्र.(०२१३३) २३०५८२ ईमेल - gcoeara@gmail.com वेबसाईट- www.gcoeara.ac.in


जा.क्र शाअसंमअ/विवि/२०२३/ 1163 दिनांक - 13 MAR 2023

## अनुसूचित जाती (SC) विद्यार्थ्यांसाठी विशेष सुचना-

विषय - शै. व. २०२१-२२ पासून अनुसूचित जाती विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती दुसरा हप्ता थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा होणेबाबत.

संदर्भ - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र: भासशी- २०२२/प्र.क्र.७४/शिक्षण-१, दि.१७/०३/२०२२

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने अनुसूचित जाती प्रवर्गातून प्रवेशित सर्व विदयार्थ्यांना कळविण्यात येते की, शै. व. २०२१-२२ पासून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र: भासशी- २०२२/प्र.क्र.७४/शिक्षण-१, दि.१७/०३/२०२२ या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील शिष्यवृत्तीचा पहिला हप्ता (४०%) प्रमाणे रुपये- ९४००/- महाविद्यालयाच्या खात्यामध्ये जमा होत आहेत. व शिष्यवृत्तीचा दुसरा हप्ता (६०%) प्रमाणे रुपये १४१००/- महाविद्यालयाच्या बँक खात्यामध्ये जमा न होता थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा होणार आहेत.

तरी अनुसूचित जाती प्रवर्गातून प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा दुसरा हप्ता (६०%) प्रमाणे रुपये १४१००/- विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा झाल्यानंतर महाविद्यालयास देय असलेली रक्कम पुढील सात दिवसांच्या आत महाविद्यालयाच्या बँक खात्यामध्ये जमा करणे बंधनकारक आहे. संबधित विदयार्थीनी याची नोंद घ्यावी.

13-3-23

(डॉ.डी.आर.पानगव्हाणे)
प्र.प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय
अवसरी खुर्द, ता.आंबेगाव जि.पुणे.

प्रत - १. विभागप्रमुख- स्वंयचल/अणुविदयुत/उपकरणीकरण/यंत्र/स्थापत्य/संगणक/उपयोजित विज्ञान/कर्मशाळा - त्यांनी या आदेशाची प्रत विभागीय सुचना फलकावर लावावी.

२. सर्वसाधारण सूचना फलक

३. डीपीयु विभाग यांनी सर्व विभागप्रमुखांना मेलद्वारे कळवावे.

४. श्रीमती. पी. व्ही. कुलकर्णी सहाय्यक प्राध्यापक, संगणक विभाग यांना विभागप्रमुखांमार्फत महाविदयालयीन संकेतस्थळावर प्रदर्शित करणेकरीता.